# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/ /२०२४** **पुणे दिनांक - ०८/०३/२०२४**

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, सहकारनगर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी पार्किंगचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

**सहकारनगर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **स्वामी विवेकानंद रस्त्यावरील बँक ऑफ महाराष्ट्र लगतच्या रस्त्यावर ५० मीटर दुचाकी वाहनांकरीता पार्किंग करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – ०८/०४/२०२४ ते दिनांक –२२ /०४/२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **प्रेसनोट**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**<br>**पुणे-४११००६** | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |

**जा.क्र./पोउआ/वाह/ /२०२४** **पुणे दिनांक - ०८/०४/२०२४**

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, कोंढवा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे दिनांक. /०४/२०२४ पासुन आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी वाहतुकीचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

## कोंढवा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,

१. **कात्रज-कोंढवा रोडवरील स्टेट बँक चौक ते शत्रुंजय मंदिर चौक ते पुंडलिक टिळेकर नगर चौक ते खडी मशीन चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी एकेरी वाहतुक मार्ग करण्यात येत आहे.**
खडी मशीन चौक ते पुंडलिक टिळेकर नगर चौक ते स्टेट बँक चौक दरम्यान सर्व वाहनांना प्रवेश बंद आहे.

१. **खडी मशीन चौक ते श्रीराम चौक ते इस्कॉन मंदिर चौक ते स्टेट बँक चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांनसाठी एकेरी वाहतुक मार्ग करण्यात येत आहे.**
स्टेट बँक चौक ते श्रीराम चौक ते खडी मशीन चौक दरम्यान सर्व वाहनांना प्रवेश बंद आहे.

३. **सर्व प्रकारच्या वाहनांना शत्रुंजय चौकामधुन उजवीकडे वळण घेवुन कात्रज कडे जाण्यासाठी प्रवेश बंद आहे.**

➢ **पर्यायी मार्ग :-** शत्रुंजय चौकामधुन डावीकडे वळण घेवुन धारीवाला शाळेसमोरुन उजवीकडे वळण घेवुन इच्छितस्थळी जावे

४. **.इस्कॉन मंदिर चौक व अहिल्यादेवी नगर मधुन येथुन उजवीकडे प्रवेश बंद आहे.**

➢ **पर्यायी मार्गः-** इस्कॉन मंदिर चौक व अहिल्यादेवी नगर मधुन येथुन डावीकडे वळण घेवुन स्टेट बँक चौक येथुन उजवीकडे वळण घेवुन इच्छितस्थळी जावे.

५. **कात्रजकडुन येवुन येवलेवाडी कडे जाणा-या सर्व प्रकारच्या वाहनांनी खडी मशीन पोलीस चौकी येथे उजवीकडे वळण घेवुन श्रीराम चौक मार्गे जावे.**

६. **येवलेवाडीकडुन खडी मशीन चौकाकडे जाणा-या सर्व प्रकारच्या वाहनांनी श्रीराम चौकामधुन सरळ खडी मशीन चौकी येथे येवुन उजवीकडे वळण घेवुन जावे.**

७. **पुंडलिक टिळेकर नगर येथुन खडीमशीन चौक, येवलेवाडी,कात्रज कडे जाण्यासाठी पुंडलिक टिळेकर नगर चौकामधुन डावीकडे वळण घेवुन खडीमशीन चौकामधुन श्रीराम चौक मार्गे जावे.**

८. **खडी मशीन पोलीस चौकी ते श्रीराम चौक दरम्यान जाणे व येणेसाठी सर्व प्रकारची जड,अवजड वाहने,ट्रक,ट्रेलर,कंटेनर,डंपर,बल्कर,रोड रोलर जेसीबी व इतर वाहनांना प्रवेश बंद आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – /०३/२०२४ ते दिनांक – /०३/२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**

**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/ २६६९ /२०२४पुणे दिनांक - ०८ /०४/२०२४**

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता,कोंढवा वाहतूक विभागांतर्गत वडाची वाडी येथे असलेल्या खडी क्रेशर ठिकाणाहुन उंड्री चौक व आंबेकर चौक या मार्गावर मोठ्या प्रमाणात डंपर व सिमेंट मिक्सरचा ये-जा होत असते. उंड्री चौक हा बॉटलनेक चौक असल्याने आणि आंबेकर चौक(जगदंब भवन रोड) हा अतिशय अरुंद असल्याने सतत मोठ्या प्रमणात वाहतूक कोंडी होत असते.सदर मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्याकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, कोंढवा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात प्रायोगिक तत्वावर **ट्रक ,डंपर, बल्कर, जेसीबी, रोलर व इतर जडवाहनांकरीता** खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

**कोंढवा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

१. वडाची वाडी ते उंड्री चौक मार्गावर - सकाळी ०८/०० ते ११/०० व सायंकाळी १७/०० ते २१/०० वाजेपर्यंत बंदी करण्यात येत आहे.
२. वडाची वाडी ते आंबेकर चौक मार्गावरुन (जगदंब भवन रोड) सकाळी ०८/०० ते ११/०० व सायंकाळी १७/०० ते २१/०० वाजेपयैत बंदी करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – ०८/०४/२०२४ ते दिनांक – २२/०४/२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

( **रोहिदास पवार** )

पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर